**सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील ग्राहकांचा सहभाग वाढविण्यासाठी ई-पॉसच्या पावती आधारित "बक्षीस योजना" राबविणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण - २०१९/प्र.क्र.१०/सं.क

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ फेब्रुवारी, २०१९

<u>वाचा</u>

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः साविबा २०१५/प्र.क्र.२०/सं.क., दि.१८ मे २०१६**

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत राज्यातील सर्व जिल्हयात दि. ०१ मे, २०१८ पासून Aadhar enabled Public Distribution System (AePDS) सुरु करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून ई-पॉस (Point of Sale Device) द्वारे शिधावस्तुंचे वितरण करण्यात येत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या Automation बाबत लाभार्थ्यांची जागृकता अत्यल्प असल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकांमध्ये जागृती व्हावी व त्याचे सक्षमीकरण व्हावे तसेच ग्राहकांना ई-पॉस द्वारे धान्य घेणे व त्याद्वारे निघणारी पावती घेण्याची सवय लागावी व पर्यायाने दुकानदारास पावती देणे बंधनकारक रहावे यासाठी जिल्हास्तरावर नाविण्यपूर्ण बक्षीस योजना राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय:-

राज्यातील रास्तभाव दुकानांतून ई-पॉसद्वारे धान्य वितरण केल्यावर निघणाऱ्या पावतीच्या क्रमांकांची निवड झालेल्या पावतीवरील शिधापत्रिकाधारकाला प्रोत्साहनात्मक बक्षीस वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर रास्तभाव दुकानातील ई-पॉस पावती आधारित "बक्षीस योजना" राबविण्याकरिता राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) द्वारे विकसित प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. ई-पॉसद्वारे निघणाऱ्या पावतीच्या आधारे बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या शिधापत्रिकाधारकाला प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्याच्या योजनेची खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१. प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला किंवा त्या महिन्यात निश्चित केलेल्या तारखेला बक्षीस योजनेसाठी निश्चित केलेल्या कालावधीत ई-पॉस द्वारे वितरीत झालेल्या धान्याच्या पावतीचा क्रमांक बक्षिसाकरिता निवडला जाईल, त्यासाठी NIC ने तयार केलेल्या प्रणालीद्वारे बक्षीसाकरिता पावतीवरील Unique Transaction क्रमांक निवडण्यात येईल. अशी बक्षीस सोडत संबंधित जिल्हयात दरमहा एकदाच काढता येईल.

२. या बक्षीस योजनेमध्ये प्रत्येक रास्तभाव दुकानांतील १ लाभार्थी, प्रत्येक झोन/तालुक्यातील १ लाभार्थी, प्रत्येक जिल्हयातील १ लाभार्थी व प्रत्येक जिल्हयातील १ रास्तभाव दुकान याप्रमाणे बक्षीसाकरिता लाभार्थी/दुकान निवडण्यात यावे. एकच लाभार्थी एकापेक्षा अधिक बक्षीसाकरिता पात्र असणार नाही.

३. १०० टक्के ई-पॉसद्वारे धान्य वितरण करणारी रास्तभाव दुकाने व त्या दुकानांतील लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. तरी जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांनी याबाबत आवश्यक माहिती शासनास कळवावी व ही माहिती शासनाकडून NIC ला सोडतीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. प्रत्येक जिल्हयातील ई-पॉसद्वारे १०० टक्के धान्य विक्रीची टक्केवारी असणाऱ्या/ एकापेक्षा जास्त रास्तभाव दुकाने असल्यास रास्तभाव दुकानांच्या १२ अंकी क्रमांकाच्या आधारे NIC प्रणालीद्वारे सोडत काढून रास्तभाव दुकान बक्षीसासाठी निवडण्यात येईल.

५. सदर बक्षीस योजनेकरिता FPS Automation साठी नियुक्त करण्यात आलेल्या System Integrator (SI) यांनी प्रायोजकाची निवड करावी अथवा स्वत: या योजनेच्या बक्षीसासाठीचा येणारा खर्च करावा. मात्र, निवडलेल्या प्रायोजकावर गुन्हयाची नोंद नसावी व तो आर्थिक गुन्हेगार नसावा.

६. बक्षीस योजनेकरिता निवडलेल्या प्रायोजकाने/System Integrator यांनी बक्षीस वितरण योजनेमध्ये सहभागी होण्याकरिता जिल्हाधिकारी यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ही परवानगी मिळवताना बक्षीसाकरिता बक्षीस योजनेसाठी निश्चित केलेला कालावधीबाबत ही त्यांची मान्यता मिळविली जावी. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा /जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी परवानगी मिळवून देण्यासाठी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

७. राजकीय पक्षांना या योजनेत प्रायोजक म्हणून सहभागी होता येणार नाही.

८. **सदर बक्षीस योजनेद्वारे देण्यात येणारी संपूर्ण बक्षीसे फक्त वस्तुच्या स्वरुपात देण्यात यावीत.** सदर बक्षीस योजनेकरिता बक्षीसासाठी निवडलेल्या वस्तुंचा प्रकार जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने अंतिम करण्यात यावा.

९. सदर योजनेमध्ये बक्षीसाकरिता क्रमांक ई-पॉसमधून वितरीत केलेल्या विक्रीच्या पावतीवरील १९ अंकी पावती क्रमांकाच्या/दुकानाच्या १२ अंकी क्रमांकाच्या आधारे काढण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळा शिधापत्रिकेवर व्यवहार झाले असल्यास त्यामधील पहिला व्यवहार हा बक्षीस योजनेसाठी ग्राहय राहील.

१०. शिधापत्रिका ज्या जिल्हयातील रास्तभाव दुकानाला जोडली असेल त्या जिल्हयातच ती शिधापत्रिका बक्षीसाकरिता ग्राहय राहील.

११. या बक्षीस योजना आयोजनासाठी System Integrator, प्रायोजक व नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्यात शासनाने पुरविलेल्या नमून्यात करार करणे आवश्यक राहील.

१२.बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन प्रायोजक अथवा SI यांनी करावे. या बक्षीस योजनेकरिता शासनामार्फत कोणताही निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. मात्र, जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप हे असे कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी योग्य सहकार्य देतील.

१३.नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा /जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी उक्त अटींचे संबंधितांनी पालन केल्याबाबत दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२२१७५७४७१२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food and Civil Supply, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2019.02.22 18:00:12 +05'30'

**(स.श्री.सुपे)**
सह सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गोवा),मुंबई,
१०.सर्व जिल्हाधिकारी,
११.सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१२.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१३.उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
१४.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१५.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
१६.सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
१७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

१८.सर्व विरोधी पक्षनेते.

१९. M/s Linkwell Telesystems Pvt. Ltd.

२०. M/s Integra Micro System (P) Ltd.

२१. M/s Oasys Cybernetics Pvt. Ltd.

२२. निवड नस्ती (सं.क.)